नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/१०/२०२६ (मंगळवार)

## पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन उत्साहात संपन्न

पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे विजयादशमीनिमित्त शस्त्रागारातील शस्त्रांचे विधिवत पूजन करण्यात आले.

यावेळी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण हे आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित होते. तसेच श्रीमती पूजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक (गृह), नागपुर ग्रामीण जिल्हा , नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच श्री. संजय क्षीरसागर, राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण यांच्यासह इतर पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.






आरमोरर टुल्स
ARMOURER
All
Rifle's
Mechanical
Officer
Under
Responsibility
Effective
Repair


एकूण शस्त्र
पो.स्टे.वाटप
पुनि दुरुस्ती कामी
प्रशिक्षण करीता
कर्तव्य कामी
एकूण वाटप
हजर शस्त्र



## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद १ लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १९/१०/२०२६ रोजी उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक यांचे पथक आणि रामटेक पोलीसांचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पोलीस स्टेशन रामटेक हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की छोट्या कॅनलचे काठावर नेरला शिवार रामटेक येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढली जात आहे. मिळालेलया माहीती च्या नमुद पथकाने नमदु घटनास्थळी जावुन धाड टाकली आरोपी नामे **पंकज राजेश ढोके, वय ३२ वर्ष, रा. कोटेश्वर रोड नगरधन ता. रामटेक** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टीत दारू काढतांना दिसुन आला.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष १) एकूण १८०० लिटर मोहाफूल सडवा रसायन किंमती ९०,०००/— रुपये, २) ०६ डबक्या मध्ये प्रत्येकी २० लिटर प्रमाणे एकूण १२० लिटर मोहाफूल गावठी हातभट्टी दारु किंमती १२,०००/— रुपये,३) लोखंडी ड्रम ,लोखंडी शेगडी प्रत्येकी, टिनाचे पिपे प्रत्येकी,जळाऊ लाकूड आणि दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण १,२१,३००/— रुपायांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

नमुद आरोपी विरुद्ध कलम कलम ६५(फ)(क),(ब)(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये २५ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १९/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये २५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** अंतर्गत आरोपी नामे शंतनु विलास चौधरी, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ८, देवाळकर मोहल्ला भिवापुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी नामे धिरने मुरलीधर अवचट, वय २६ वर्ष, रा. बुधवारीपेठ, ता. उमरेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत १. आरोपी नामे मनोज सुर्यभान ब्रम्हपुरीकर, वय ३० वर्ष, रा. गरदेव चौक मौदा २. श्रामकिसन हरीराम कुशवाह, वय ३५ वर्ष, रा. केसलापूर ता. मौदा ३. मधुकर शिवराम डहारे, वय ६६ वर्ष, रा. डहाळी ता. मौदा ४. दिनेश उमराव कुशवाह, वय ३२ वर्ष, रा. केसलापूर, ता. मौदा हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत आरोपी नामे १. सुधाकर विठ्ठलराव जुनघरे, वय ५० वर्षे, रा. विवेकानंद नगर कन्हान, ता. पारशिवनी जिल्हा नागपुर २. नंदकुमार बुधराम विश्वकर्मा, यय २५ वर्ष, रा. मडीबाबा खदान क्र. ३, कन्हान ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत आरोपी नामे पंकज चरनदास शेंडे, वय ३५ वर्षे, रा. सावळी ता. कामठी हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी नामे १. नितेन्द्र दशरथ निनावे, वय २४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६, आदर्श नगर, न्यू नांदा कोराडी ता. कामठी, जि. नागपूर २. देवेंद्र मुन्नासिंग जाधव, वय ३२ वर्ष, रा. नांदा कोराडी दादा धुनिवाले मंदीर जवळ, ता. कामठी, जि. नागपुर ३. गौरव

ऋषि बरमैय्या, वय २३ वर्ष, रा. आदर्ष नगर वार्ड क्रं. ०६ कोराडी जि. नागपुर ४. राजु जयराम बारई, वय ५९ वर्ष, राह. वार्ड क्र. ६, आदर्ष नगर नांदा कोराडी, जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत आरोपी नामे हरपाल सेवकराम हनवत, वय ४९ वर्ष, रा. बरघाट जिल्हा सिवनी (म.प्र) ह. मु. खिडकी (बेलदा रोड) ता. रामटेक जि. नागपुर २. प्रविण कुंजीलाल पिंपलवार, वय ३४ वर्ष, रा. देवलापार (बेलदा रोड) ता. रामटेक, जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन मोहपा** अंतर्गत आरोपी नामे १) राजेश पंजाबरा गजभिये, वय ३४ वर्ष २) पवन देविदास कुर्वे, वय २४ वर्ष, दोन्ही राह. ८ मैल, ग्रामपंचयात जवळ वार्ड क्रं. ५, नागपूर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे महेन्द्र चंद्रभानजी गिरघुसे, वय २९ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी नामे रोहन अनिल कातकडे वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. १६ रेल्वे स्टेशन तिखे लेआउट कळमेश्वर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत आरोपी नामे भानुदास रामाजी बिरे, वय ५० वर्ष, रा. सोनेगाव लोधी हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी नामे जितेन्द्र नथ्थुजी बोभाटे, वय ३८ वर्ष, रा. तेलीपूर हिंगघाट, तह. जि. वर्धा, ह. मु. तलमले ले आउट, वार्ड क्र. १, बुटीबोरी ता.जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी नामे १. मनोज हेमराज गौरखेडे, वय ३२ वर्ष, रा. भिष्णुर, ता. नरखेड २. अक्षय नरेद्र ईरखेडे, वय २५ वर्ष, रा. गळपुरा काटोल, ता. काटोल जि. नागपुर हा वेगवेगळया ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी नामे रामदास विष्णुजी लवुळर, वय ४६ वर्षे, रा. मोवाड वार्ड क्र. ०६, ता. नरखेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी नामे गौरव अर्जून मून्ने, वय २१ वर्ष,

रा. पी.एच.सी. अंबिकानगर कोंढाळी, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक १९/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन देवलापार, पाचगाव आणि केळवद येथे खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन देवलापार** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांनी हिवरा बाजार आठवडी बाजार येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास गावातील नागरीक, महिला, युवक वर्ग उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव दुर्गादेवी मंडळ येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास गावातील नागरीक, महिला, युवक वर्ग उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन केळवद** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिष ठाकुर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांनी भिक्कुलाल चांडक विद्यालय केळवद येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा बलइमतबतपउमणहवअणपद या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.**

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.







# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १८/१०/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, सोनेघाट शेत शिवार रामटेक येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे रामटेक पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) चंद्रशेखर चिंतामण राऊत, वय २१ वर्ष, रा. चौघान, ता. रामटेक, जि. नागपुर २) अशोक बालकृष्ण उईके, वय ३० वर्ष, रा. सोनेगाट, ता. रामटेक जि. नागपुर,**

**३) नितेश वासुदेव उईके, वय ३१ वर्ष, रा. सोनेगाट, ता. रामटेक जि. नागपुर, ४) आकाश सुखदास धुर्वे, वय २८ वर्ष, रा. सोनेगाट, ता. रामटेक, जि. नागपुर, ५) प्रविण भगवान उईके, वय २३ वर्ष, रा. सोनेगाट, ता. रामटेक जि. नागपुर, ६) फिरोज करीम कुरेशी, वय २८ वर्ष, रा. आझाद वार्ड, ता. रामटेक जि. नागपुर, ७) आर्यन बबलू मडावी, वय २१ वर्ष, रा. सोनेघाट, ता. रामटेक, जि. नागपुर, ८) समीर प्रकाश ईनवाते, वय २२ वर्ष, रा. सोनेघाट ता. रामटेक जि. नागपुर, ९) योगेश सुनील उके, वय १९ वर्ष, रा. सोनेघाट ता. रामटेक जि. नागपुर, १०) रोहीत रमेश कोडवते, वय २० वर्ष, रा. सोनेघाट ता. रामटेक, जि. नागपुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ७०९०/—रूपये असा एकुण ७०९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद १० आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ११ गुन्हे दाखल,

**दिनांक १९/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ११ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे नरेश कोठीराम पटले, वय ३५ वर्ष, रा. बुटटीबोरी दुर्गा माता मंदीर जवळ, वार्ड क्र. ०२, ता. जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी सुरज दिनकर ठाकरे, वय ३२ वर्ष, कोलार ता. जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे वासूदेव लालजी नवडती, वय ३० वर्ष, रा. सिल्लेवानी, ता. पांढूर्णा, जि. पांढूर्णा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे धनराज दौलत धोटे, वय ३५ वर्ष, रा. सावरगाव, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे प्रशांत नागोजी शेंडे, वय २५ वर्ष, रा. नवेगाव (ईसापुर) त. कुही याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे १. रामभाउ नत्यु सोनेकर, वय ५९ वर्ष, रा. फेगड, ता. कुही, जि. नागपुर २. पिरादी मोतीरम, वय ६४ वर्ष, रा. फेगड, ता. कुही, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १. पंकज राजेश ढोके, वय ३२ वर्ष, राहणार कोटेश्वर रोड नगरधन तालुका रामटेक २. बाबुलाल रामभाऊ दमाहे, वय ५५ वर्ष, राहणार हातोडी टोली तालुका रामटेक ३. राधेश्याम छोटू कुंभरे, वय ६० वर्ष, राहणार महाराजपुर तालुका रामटेक ४. विष्णु शंकर आकरे, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, साटक ता. पारशिवनी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण २५२० मिली देशी दारू, १६० लीटर मोहाफुल दारू, १८०० लीटर मोहाफुल सडवा, इतर साहित्य असा एकुण १,२६,४२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २०/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २४ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव ०७ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १५ आरोपी, अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.









जनसंपर्क अधिकारी
नागपुर ग्रामीण जिल्हा